**MHBI080001022019**

-

## कि.दि.अ.क्र. ३८/२०१९ मधील निशाणी क्र. २९ खालील आदेश

अर्जदारांनी सदरचा अर्ज मयत मूळ अर्जदार क्र.१ सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवार याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, मयत मूळ अर्जदार सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवारू हा ता. ०४.०८.२०२० रोजी मयत झाला असून त्याला योगेश सत्यप्रकाश रुद्रवार हा कायदेशीर वारस आहे. त्यामुळे सदरचे वारस सदरचे प्रकरणात अभिलेखावर अर्जदार म्हणून घेणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास सामनेवाला ने जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र. १ बाबत**

४. मी अर्जदारांतर्फे विद्वान वकील श्री. तौर व सामनेवाला तर्फे विद्वान वकील श्री. देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. मयत मूळ अर्जदार सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवार हा ता. ०४.०८.२०२० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. अर्जदारांनी सदरच्या अर्जासोबत शपथपत्र व कै. सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवारू याचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदरचे मुळ अर्जदाराचे वारसांना सदरचा अर्ज चालविण्याचा अधिकार आहे. त्यामुळे मयत अर्जदाराचे नाव मुळ अर्जातून कमी करणे व त्याच्या वारसाची नावे अर्जदार म्हणून अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.२९ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

GHANWAT SOPAN DASHRATH Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH Date: 2024.06.18 15:32:32 +0530

दिनांक – १८.०६.२०२४ (सो.द. घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माजलगाव.

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा अाहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | ए.एम.दशरथ |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | १८/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | १८/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | १८/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १८/०६/२०२४ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – १८/०६/२०२४

(ए.एम्.दशरथ)
लघुलेखक ग्रेड – १,
जिल्हा न्यायालय, माजलगाव